नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/03/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## अनैतिक देह व्यापारास प्रवृत्त करणाऱ्या आरोपीतांना अटक

## अनैतिक मानवी प्रतिबधक कक्ष नागपूर ग्रामीण यांची कारवाई

पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत ०६ कि.मी अंतरावरील मौजा ड्रीमविला फॅमिली रेस्टॉरेंट, लॉजिग नयाकुंड येथे दिनांक २३/०३/२०२३ चे १५.२० वा. ते १८.०० वा. दरम्यान अनैतीक मानवी प्रतिबधक कक्ष ना.ग्रा येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारां कडुन माहीती मिळाली की, यातील **आरोपी क्रमांक २) शुभम कारेमोरे वय ३० वर्ष रा. सावनेर चे मार्फतीने आरोपी क्र. ०१) नामे— सुनिल चंद्रभान मेश्राम वय ४६ वर्षे उमरेड बायपास गिरड रोड** नमुद घटनास्थळी हा स्वत:चे आर्थीक फायदया करीता पिडीतेस पैश्याचे आमीष देवुन देहव्यापारास प्रवृत्त करून त्यांना ग्राहकांना पुरवुन देहव्यापार करून घेतो अशी खात्रीशीर माहीती मिळाल्यावरून सदरची माहीती ही मा. पोलीस उप अधिक्षक तथा वरीष्ठ पोलीस निरीक्षक नागपुर ग्रामीण यांना देवुन त्यांचे आदेशाने बोगस पंटर पंचनामा कारवाई करून बोगस ग्राहक पाठवुन व त्याच्या इशाऱ्या प्रमाणे पोलीस स्टाफ सह रेड कारवाई करण्यात करून आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मपोहवा ज्योती वानखेडे, नेमणुक अनैतीक मानवी प्रतिबधक कक्ष ना.ग्रा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३, ४, ५ अनैतिक व्यापार प्रतिबंध अधि. सहकलम ३७०, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पो.नि. सोनवाणे पो.स्टे पारशिवनी मो. क्र. ७०२०५७७४६९ हे करीत आहे.

सदरची कारवाई ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस उप अधिक्षक श्री. राजेंद्र निकम, सहायक पोलीस निरीक्षक श्री. कृष्णा तिवारी महिला पोलीस उपनिरीक्षक मिरा मटाने, महिला पोलीस हवालदार उर्मिला हत्तीमारे, महिला पोलीस शिपाई मालिनी मोहीते, पोलीस शिपाई प्रफुल भातुलकर, निलेश बरडे चालक पोलीस हवालदार आसिफ सय्यद यांनी पार पाडली

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. जलालखेडा :— अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा थुगावदेव येथे दिनांक २४/०२/२०२३ चे १६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— लक्ष्मण विठोबाजी चरपे, वय २८ वर्षे, रा. थुगावदेव ता. नरखेड जि. नागपुर याचे वडील **मृतक नामे— विठोबाजी मारोती चरपे, वय ६५ वर्षे, रा. थुगावदेव ता. नरखेड जि. नागपुर** हे रस्त्याने शेतातुन पायदळ घरी परत येत असतांना यातील **मोटरसायकल होन्डा शाईन चा चालक व आरोपी नामे— रवी फुलचंद मरकाम रा. मिर्ची प्लाट वरूड ता. वरूड जि. अमरावती** याने आपली मोटरसायकल डबलसीट भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे वडीलाला मागुन धडक मारली त्यामुळे फिर्यादीचे वडील जखमी झाल्याने त्यांना उपचारा करीता लोकांनी प्राथमिक आरोग्य केंद्र जलालखेडा येथे नेले असता तेथील वैदयकिय अधिकाऱ्यांनी तपासुन फिर्यादीचे वडीलाला मृत घोषीत केले तसेच मोटरसायकलवर मागे डबलसीट बसलेला इसम नामे — रामु रामभाउ देवुळकर हा सुध्दा जखमी झाला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९,३३७, ३०४(अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मनोज चौधरी हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**